# मुंबई मेट्रो रेल उभारणार १२५० खाटांचा कोविड कक्ष

मुंबई, दि. २४ (प्रतिनिधी) - कुलाबा ते सीप्झ भुयारी रेल्वेचे काम करणाऱ्या मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे मुंबई शहरात दोन कोविड दक्षता सुविधा केंद्रांची उभारणी करण्यात येणार आहे. यापैकी एक ८०० खाटांचे अलगीकरण केंद्र दहिसर चेक नाका परिसरात उभारण्यात येणार आहे.

येथे २०० ऑक्सिजनीटेड खाटा देखील उपलब्ध असणार आहेत, तर कंदार पाडा, बोरिवली आरटीओ कार्यालयानजीक २५० खाटांचा आणखीन एक कक्ष उभारण्यात येणार आहे. येथे high dependency units (HDU) तसेच डायलिसिसची सुविधा असणारा अतिदक्षता विभाग देखील असणार आहे. या दोन्ही केंद्रांचे काम युद्ध पातळीवर सुरू असून दोन आठवड्याच्या आत हे काम पूर्ण होणे अपेक्षित असल्याचे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने म्हटले आहे.